संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज...

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com

● वर्ष : ७ वे ● ● अंक : ५० वा ● ● शुक्रवार दि. १८ ऑगस्ट २०२३ ● ● किंमत २ रू ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025




● सांगलीत पत्रकार कायद्याची गांधी पुतळ्यासमोर प्रतिकात्मक होळी ●

## पत्रकार संरक्षण कायदयाची कठोर अंमलबजावणी करा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** पत्रकारांवरील हल्ल्याचे खटले जलदगती न्यायालयामार्फत चालविणे आणि पाचोरयाचे आमदार किशोर पाटील यांच्यावर कारवाई करा, या मागण्यासाठी सांगलीतील पत्रकारांनी निदर्शने केली, येथील महात्मा गांधी पुतळ्यासमोर पत्रकार संरक्षण कायदयाची प्रतिकात्मक होळी करून घोषणाबाजी केली.

पत्रकारांवरील वाढते हल्ले, पत्रकार संरक्षण कायदयाची अंमलबजावणी करण्यास होत असलेली टाळाटाळ आणि आमदार किशोर पाटील यांच्या अरेरावीचा निषेध करण्यासाठी महाराष्ट्रातील ११ प्रमुख पत्रकार संघटनांचे सर्व पत्रकार गुरूवारी राज्यभर निदर्शने करून पत्रकार संरक्षण कायदयाची होळी करण्याचा निर्णय घेतला होता, त्याप्रमाणे मराठी पत्रकार परिषेदेश संलग्न सांगली जिल्हा पत्रकार संघ, डिजिटल पत्रकार परिषद यांनी निदर्शने केली.

यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष शिवराज काटकर म्हणाले, महाराष्ट्रात ८ नोव्हेंबर २०१९ पासून पत्रकार संरक्षण कायदा लागू झाला आहे, हा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे, याचा आम्हाला नक्कीच अभिमान आहे. महाराष्ट्राचा हा कायदा पुरेसा सक्षम आणि चांगला असला तरी त्याची अंमलबजावणी होत नसल्याने तो आता कुचकामी ठरला आहे. राज्यात गेल्या चार वर्षात जवळपास २०० पत्रकारांवर हल्ले झाले किंवा त्यांना, धमक्या, शिविगाळ केली गेली. मात्र केवळ ३७ प्रकरणातच पत्रकार संरक्षण कायदा लागू केल्याने आणि त्यातील एकाही प्रकरणात आरोपीला शिक्षा न झाल्याने या कायद्याची उपयुक्तता संपली असून कायदयाची भितीच समाजकंटकांचा मनात उरली नाही. सांगली जिल्ह्यात सुद्धा दोन प्रकरणे घडली, ज्या अजून आरोपी मोकाट आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात पुन्हा एकदा चिंता वाटावी एवढ्या मोठ्या संख्येनं पत्रकारांवरील हल्ले वाढले आहेत.

जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी म्हणाले, पाचोरा येथील एका पत्रकारास आमदार किशोर पाटील यांनी अगोदर शिविगाळ केली आणि दुसऱ्या दिवशी आपल्या गुंडाकरवी त्यांच्यावर हल्ला चढविला, हे चित्र उभ्या महाराष्ट्राने पाहिले, ऐकले आहे. असे असले तरी मारहाण करणाऱ्या गुंडांवर किंवा शिविगाळ आणि धमक्या देणारया आमदार किशोर पाटील यांच्यावर पत्रकार संरक्षण कायद्याखाली गुन्हा दाखल झालेला नाही. पत्रकारांवर जे हल्ले होतात त्यातील ७५ टक्क्यावर हल्ले हे राजकीय पक्षांच्या नेत्यांकडून किंवा त्यांच्या कार्यकर्त्यांकडून होतात हे वास्तव आकडेवारीसह समोर आलेलं आहे, मग अशा प्रकरणात राजकीय हस्तक्षेप होतात आणि पोलीस पत्रकार संरक्षण कायद्याचं कलम न लावता साधी एनसी दाखल करून हा विषय बंद करून टाकतात, असे प्रकार वारंवार आणि सर्वत्र दिसून येत आहेत, हे थांबलं पाहिजे.

यावेळी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष बलराज पवार, सरचिटणीस प्रवीण शिंदे, हल्ला विरोधी संघाचे अध्यक्ष गणेश कांबळे, डिजिटल मीडिया अध्यक्ष तानाजी जाधव, ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत क्षीरसागर, प्रकाश वीर, उदयसिंग राजपूत, चंद्रकांत गायकवाड, विकास सूर्यवंशी, सचिन ठाणेकर, कुलदीप देवकुळे, किशोर जाधव, किरण जाधव, दारिकांत माळी आदींसह विविध दैनिक आणि माध्यमांचे पत्रकार यावेळी मोठ्या संख्येत उपस्थित होते.



सांगली : पत्रकार कायद्याची गांधी पुतळ्यासमोर प्रतिकात्मक होळी करताना पत्रकार

## रस्ते कामामुळे गावांच्या विकासाला चालना

**ब्रम्हानंद पडळकर : आवळाई येथे रस्ते कामाचा शुभारंभ**



आवळाई : येथे रस्ते कामाच्या शुभारंभ प्रसंगी उपस्थित ब्रम्हानंद पडळकर, जयवंत सरगर, अनिल पाटील, गजेंद्र पिसे, दादासो शिंदे व उपस्थित मान्यवर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** रस्ते हे गावाच्या विकासात महत्वाची भूमिका बजावत असतात. त्यामुळे भाजप सरकार रस्त्यांचा विकास करण्यास प्राधान्य देत असून आटपाडी तालुक्यातील सर्व गावे, वाड्या-वस्त्या ह्या डांबरी रस्त्याने जोडण्यासाठी व जनतेला वीज, पाणी व आरोग्य या सारख्या मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्या बरोबरच संपूर्ण तालुक्याच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन सांगली जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती ब्रह्मानंद पडळकर यांनी केले.

आवळाई येथे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या विकास निधीतून मंजूर झालेल्या आवळाई ते पिसेवाडी डांबरीकरण कामाच्या भूमिपूजन व उद्घाटन सोहळा संपन्न झाला. यावेळी युवा नेते जयवंत सरगर, युवा नेते अनिल पाटील, पंचायत समितीचे बांधकाम अधिकारी श्री. देवांग, विष्णुपंत अर्जुन, विलास काळेबाग, आवळाई गावचे सरपंच गजेंद्र पिसे, उपसरपंच दादासो शेंडे, संपत कोळेकर, आबासो भानवसे, अनिल सुर्यवंशी, अनिरूध्द देशमुख, विलास साळुंखे, भीमराव पिसे.मिलींद साळंखे. ऋषिकेश कुलकर्णी ओमकार डुबुले व इतर आवळाई येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तासगावात ट्रॅफिक पोलिसांच्या क्रेनच्या खाजगी साहित्याच्या वाहतुकीसाठी वापर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**तासगाव :** तासगावात ट्रॅफिक पोलिसांकडे असलेल्या क्रेनच्या गाडीचा वापर खाजगी साहित्याच्या वाहतुकीसाठी झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या क्रेनमध्ये खाजगी व्यक्तीचा बेड, गादी घेऊन ही गाडी मणेराजुरीच्या दिशेने गेली आहे. ही वाहतूक करतानाचा व्हिडिओ व्हायरल होत आहे.

तासगाव येथील वाहतूक व्यवस्था दिवसेंदिवस कोलमडत चालली होती. दुचाकी व चार चाकी गाड्यांचे पार्किंग कुठेही केले जात होते. त्यामुळे ट्राफिकची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत चालली होती. या समस्येवर मार्ग काढण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून तासगाव पोलिसांना 'नो पार्किंग' मधील गाड्या उचलण्यासाठी क्रेन दिले आहे.

या क्रेनसाठी पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून टेंडर काढले जाते. ज्या व्यक्तीला हे टेंडर मिळते, त्या व्यक्तीचे कामगार व एक वाहतूक पोलीस असे लोक शहरातील वाहतूक नियंत्रित करण्याचा प्रयत्न करतात. ज्या गाड्या 'नो पार्किंग' मध्ये लावलेल्या असतात त्या उचलून संबंधित वाहन चालकांकडून दंड वसूल केला जातो.

मात्र आता याच वाहतूक क्रेनच्या गाडीतून खाजगी साहित्याची वाहतूक होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आज गुरुवारी सायंकाळी या गाडीतून चक्क बेड आणि गादी नेण्यात येत होती. हे साहित्य घेऊन क्रेनची गाडी तासगाव येथील वसंतरावदादा पाटील महाविद्यालयापासून मनेराजुरीच्या दिशेने गेली असून सध्या हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियामध्ये मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

## नियमांचे उल्लंघन केल्यास साऊंड सिस्टीम जप्त करणार : महेंद्र पंडित

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कोल्हापूर :** गणेशोत्सवात ध्वनिमर्यादा पाळल्या नाहीत, तर मंडळांसोबतच साऊंड सिस्टीम, लेसर शो चालक, मालकांवर गुन्हे दाखल करून सिस्टीम जप्त केली जाणार आहे. त्यामुळे साऊंडवाल्यांनी नियमांचे पालन करावे, लेसर शोचा वापर टाळावा, अशा सूचना पोलिस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी दिल्या. अलंकार हॉल येथे साऊंड सिस्टीम चालक, मालकांच्या बैठकीत ते बोलत होते. तुम्ही एक दिवस पोलिसांना त्रास दिला, तर पोलिस तो सहन करतीलही; परंतु पुढचे ३६४ दिवस पोलिसांचेच असतील, हे लक्षात घ्या, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

नियमांचे उल्लंघन झाल्याचा गुन्हा सिद्ध झाल्यास ५ वर्षे कारावास व दंडाची कायद्यात तरतूद आहे.



महेंद्र पंडित

पोलिस अधीक्षक महेंद्र पंडित म्हणाले, ध्वनी यंत्रणांचे मालक मंडळांकडून भाडे घेत असले, तरी ते कायद्याला बांधिल आहेत. नियमांचे उल्लंघन करून त्यांना व्यवसाय करता येणार नाही. परवानगीपासून ते आवाज मर्यादेपर्यंत सर्वप्रकारची खबरदारी त्यांना घ्यावी लागेल. लेसर आरोग्याला घातक असल्यामुळे त्यांचा वापर करूच नये. स्ट्रक्चरची लांबी, रुंदी, आवाज, वेळ याचे उल्लंघन झाल्यास सर्व यंत्रणा जप्त करून मंडळांसह ध्वनी यंत्रणा मालक, चालक, वाहनधारक अशा सर्वांवर गुन्हे दाखल होतील.

या बैठकीत उदय गायकवाड, डॉ.आसावरी जाधव, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी उदय माने यांनी मोठ्या आवाजाच्या ध्वनी यंत्रणांचे धोके स्पष्ट केले. शहर पोलिस उपअधीक्षक अजित टिके यांनी पोलिस अगोदर तुम्हाला कायद्याची माहिती देत आहेत. परंतु, कायदे पाळले नाहीत तर दोषींवर कारवाई अटळ आहे, असे सांगितले.

साऊंड सिस्टीम असोसिएशनचे अध्यक्ष मुनीर मुल्ला यांच्यासह इंद्रजित ऐनापूरकर, विजय वरुटे यांनी नियमांमध्ये सवलत मिळावी, अशी विनंती केली. बैठकीसाठी अप्पर पोलिस अधीक्षक जयश्री देसाई उपस्थित होत्या. पोलिस निरीक्षक सतीशकुमार गुरव यांनी सूत्रसंचालन केले. तानाजी सावंत यांनी आभार मानले.

## अजित पवारांना मुख्यमंत्री करणे भाजपला महागात पडेल : बच्चू कडू

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नागपूर :** आमदार बच्चू कडू यांनी अजित पवार यांना मुख्यमंत्री केल्यास भाजपला महागात पडेल असा इशारा त्यांनी भाजपला दिला आहे.



बच्चू कडू

बच्चू कडू म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्य मंत्रिमंडळातील मंत्र्यांसाठी ठेवलेल्या स्नेहभोजनाचे निमंत्रण आपल्याला नाही. आपण कॅबिनेट मंत्री नसल्यामुळे कदाचित हे निमंत्रण आले नसेल. पण दर्जा आणि मंत्रिपद यात बरेच अंतर आहे. मात्र आता छातीवर तलवार ठेवली तरी आपण मंत्री होणार नाही असे पुन्हा एकदा त्यांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मुख्यमंत्री केले तर भाजपला त्याचे परिणाम भोगावे लागतील असे खळबजनक विधान बच्चू कडू यांनी केले.

बच्चू कडू यांच्या या विधानाने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. उपमुख्यमंत्री म्हणून अजितदादा पवार आणि सहकाऱ्यांचा मंत्री म्हणून शपथविधी झाल्यानंतर गेल्या काही दिवसात महायुतीत सर्व काही ऑलवेल नसण्याचे बोलले जाते. आमदार बच्चू कडू यांनी देखील मोर्चा काढण्यासोबतच वेळोवेळी वेगळी भूमिका गेल्या काही दिवसात घेण्याचे संकेत दिले आहेत. या पार्श्वभूमीवर आता त्यांच्या नाराजीला, या विधानाला राजकीय महत्त्व आले आहे.

काँग्रेसच्या गटातूनही बच्चू कडू भविष्यात मविआसोबत येतील असा विश्वास मध्यंतरी व्यक्त करण्यात आला होता. आमदार बच्चू कडू यांनी आता आपल्याला मंत्रिपदात रस नाही संधी मिळालीच तर दुसऱ्या सहकाऱ्याला ती दिली जाईल असे स्पष्ट करतानाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठी रिस्क घेऊन शिवसेना सोडली. त्यांच्या या धाडसामुळेच भाजपचे सरकार सत्तेत आले, असे असताना आता त्यांना मुख्यमंत्री पदावरून दूर करत इतरांना संधी देण्याचा प्रयत्न झाल्यास त्याचे निश्चितच परिणाम भाजपला भोगावे लागतील असा इशारा दिला आहे.












# संपादकिय

## बिल्किस बानो प्रकरण

गुजरात सरकारच्या बिलकीस बानो प्रकरणातल्या ११ आरोपींना तुरुंगातून मुक्त करण्याच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. आरोपींना मिळालेली फाशीची शिक्षा देण्याऐवजी त्यांना जन्मठेप का सुनावली गेली? १४ वर्षे तुरुंगावास भोगल्यानंतर त्यांना मुक्त का करण्यात आलं? बिलकीस बानो प्रकरणातले आरोपी जसे सोडले गेले तोच न्याय इतर कैद्यांना का लावला गेला नाही? असे प्रश्न आता सर्वोच्च न्यायालयाने गुजरात सरकारला विचारले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी असं म्हटलं आहे की बिलकीस बानो प्रकरणात ज्यांनी गंभीर गुन्हा केला आहे अशाच आरोपींना सुटकेच्या धोरणाचा फायदा का करुन दिला गेला? तुरुंगात इतरही कैदी आहेत. त्यांना सुधारण्यासाठी संधी गुजरात सरकारने का दिली नाही? बिलकीस बानो प्रकरणातल्या दोषींना सोडण्यासाठी तुरुंग प्रशासनाने जी समिती तयार केली ती कुठल्या निकषांवर तयार केली? त्याचं स्पष्टीकरण दिलं जावं असंही आता सर्वोच्च न्यायालयाने गुजरात सरकारला सांगितलं आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने गुजरात सरकारला फटकारले असल्याने पुन्हा बिल्किस बानो प्रकरण चर्चेत आले आहे. जस्टिस बी.व्ही. नागरत्ना आणि जस्टिस उज्जल भुइयां यांच्या पीठाने बिलकीस बानोच्या याचिकेवर सुनावणी करण्यास सुरुवात केली आहे. ज्या सुनावणीत गुजरात उच्च न्यायालयाने बिलकीस बानो प्रकरणातल्या ११ दोषींना तुरुंगातून मुक्त केल्याच्या निर्णयाला आव्हान देण्यात आले आहे. २००२ मध्ये झालेले गुजरात दंगे, बिल्किस बानोवर सामूहिक बलात्कार, तिच्या संपूर्ण कुटुंबाची हत्या या प्रकरणात या आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. त्यांना कुठल्या आधारावर मुक्त केलं याचं उत्तर आता सर्वोच्च न्यायालयाने गुजरात सरकारकडे मागितलं आहे. २००२ च्या गुजरात दंगलीदरम्यान बिलकीस बानोवर सामूहिक बलात्कार झाला. तसंच तिच्या कुटुंबाची हत्या करण्यात आली. या प्रकरणात ११ जणांना दोषी ठरवण्यात आलं. गेल्या वर्षी १५ ऑगस्ट २०२२ ला या सगळ्यांची मुक्तता करण्यात आली. त्यानंतर गुजरात सरकारच्या या निर्णयाविरोधात बिलकीस बानो यांनी सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावत या निर्णयाला आव्हान देणारी याचिका दाखल केली. त्यावरच सध्या सुनावणी सुरु आहे. हा निर्णय जेव्हा गुजरात सरकारने जेव्हा हा निर्णय दिला तेव्हा त्यांच्या या निर्णयावर देशभरातून टीका झाली. तसंच सामाजिक कार्यकर्त्या सुभाषिनी अली आणि टीएमसीच्या खासदार महुआ मोइत्रा यांनीही ११ दोषींना सोडण्यात आलं तो निर्णय गुजरात सरकारने रद्द करावा अशी मागणी केली होती. परंतु आता सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा या प्रकरणी गुजरात सरकारला झापले आहे.




# मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकासासाठी गठित मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासोबतच मराठा आरक्षण आणि सुविधांसाठी शासन सकारात्मक आहे. दि.९ सप्टेंबर २०२० ते ५ मे २०२१ दरम्यान सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग (एसईबीसी) मधून आर्थिकदृष्ट्या मागास वर्ग (ईडब्ल्यूएस) विकल्प घेतलेल्या उमेदवारांच्या नियुक्ती संदर्भात उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. याबाबत शासन सकारात्मक पाठपुरावा करेल, असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.



मुंबई : येथे मंत्रालयात मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकासासाठी गठित मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक संपन्न झाली. यावेळी बैठकीला उपस्थित मंत्री चंद्रकांतदादा पाटील व उपस्थित मान्यवर

मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकासासोबतच मराठा आरक्षण आणि सुविधांसाठी गठीत मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक समितीचे अध्यक्ष उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात संपन्न झाली. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) दादाजी भुसे, राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई (दूरदृश्य प्रणालीद्वारे), आमदार प्रवीण दरेकर, अण्णासाहेब पाटील महामंडळाचे अध्यक्ष, माजी आमदार नरेंद्र पाटील, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, विधी व न्याय विभागाचे सचिव नीरज धोटे, गृह विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव सुमंत भांगे, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मंगेश मोहिते व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. पाटील म्हणाले, दि.९ सप्टेंबर २०२० ते ५ मे २०२१ दरम्यान एसईबीसी मधून ईडब्ल्यूएस विकल्प घेतलेल्या उर्वरित उमेदवारांच्या नियुक्ती संदर्भात दि. २ फेब्रुवारी २०२३ रोजी प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट) मुंबई यांनी दिलेले आदेशानुसार दि. २३ डिसेंबर २०२० रोजीचा शासन निर्णय अवैध ठरविल्यामुळे या उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आलेल्या नाहीत. याबाबत उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे.

यासंदर्भात राज्य शासनाकडून पाठपुरावा सुरु आहे. या उमेदवारांना न्याय देण्यासाठी शासन सकारात्मक राहील, असेही मंत्री श्री. पाटील यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या क्युरेटिव्ह याचिकेसंदर्भात पुढील आठवड्यात दिल्ली येथे जाणार असल्याचेही या बैठकीत सांगितले.

यावेळी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या निधी संदर्भात आढावा घेण्यात आला. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्था (सारथी), आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय), या संस्थांकडून देण्यात येणाऱ्या शैक्षणिक सवलती, नियमावली यामध्ये एकसूत्रता आहे का हे विद्यापीठ अनुदान आयोग(युजीसी)च्या निकषानुसार तपासून पाहावे असे निर्देश सबधितांना मंत्री श्री.पाटील यांनी बैठकीत दिले.

# बाल शक्ती पुरस्कारासाठी अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्ट पर्यंत

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** केंद्र शासनाच्या महिला व बालविकास विभागामार्फत बाल शक्ती पुरस्कार व बालकल्याण पुरस्कार दिला जातो. बाल शक्ती पुरस्कार सन २०२४ करीता केंद्र शासनाने अर्ज मागविलेले आहेत **अर्ज** www.awards.gov.in या संकेतस्थळामार्फत ऑनलाईन पध्दतीने स्वीकारले जाणार आहेत. पुरस्कारांची माहिती या संकेतस्थळावर देण्यात आली असून अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ३१ ऑगस्ट २०२३ पर्यंत आहे. अशी माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुवर्णा पवार यांनी दिली.

वय वर्षे ५ पेक्षा अधिक व १८ वर्षापर्यंतच्या ज्या मुलांनी शिक्षण, कला, सांस्कृतिक कार्य, खेळ, नाविण्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य व शौर्य अशा क्षेत्रात विशेष नैपुण्यपूर्ण कामगिरी केली आहे त्यांना बाल शक्ती पुरस्कार दिला जातो. मुलांच्या विकास, संरक्षण व कल्याण या क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे वेतन अथवा मानधन न घेता मानसेवी उदात्त भावनेतून किमान ७ वर्षे काम करणाऱ्या व्यक्तिस बालकल्याण पुरस्कार हा वैयक्तीक पुरस्कार दिला जातो. तसेच संस्था स्तरावर बालकल्याण क्षेत्रात अपवादात्मक कार्य करणाऱ्या संस्थेला बालकल्याण पुरस्कार दिला जातो. संस्था पूर्णत: शासनाच्या निधीवर अवलंबून नसावी. बालकल्याण क्षेत्रात किमान १० वर्षे सातत्यपूर्ण उत्कृष्ट कार्य करणारी असावी.

# फॅबटेक पॉलिटेक्निक चा विठाई ऑटो इंडस्ट्री बरोबर सामंजस्य करार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगोला :** मंगळवेढा तालुक्यात ऑटोमोबाईल क्षेत्रात अल्पावधी मध्ये लोकप्रिय झालेल्या विठाई ऑटो इंडस्ट्री या कंपनी बरोबर फॅब्रटेक पॉलिटेक्निक कॉलेज ने सामंजस्य करार केला असल्याची माहिती पॉलिटेक्निक चे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा.तन्मय ठोंबरे यांनी दिली.



सांगोला : विठाई ऑटो इंडस्ट्री या कंपनी बरोबर फॅब्रटेक पॉलिटेक्निक कॉलेज ने सामंजस्य करार केला यावेळी उपस्थित कंपनीचे अधिकारी व कॉलेजचे प्राचार्य व संस्थेचे चेअरमन

अशा प्रकारे सामंजस्य करार केल्यामुळे विद्यार्थ्यांना नविन तंत्रज्ञान शिकण्यास मदत मिळणार आहे. तसेच इंडस्ट्रियल व्हिजिट ,एक्सपर्ट लेक्चर व ट्रेनिंग साठी कंपनीकडून सहकार्य मिळणार असून विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रात झेप घेता यावी यासाठी एक प्रकारचे प्रोत्साहन मिळणार असल्याचे पॉलीटेक्निक चे प्राचार्य डॉ.शरद पवार यांनी सांगितले.या वेळी कंपनीचे ओनर मा. श्री .शहाजी इंगोले यांनी विद्यार्थ्यांना नवउद्योजक बनण्यासाठी व शैक्षणिक प्रगतीसाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी भविष्यात देखील अशाप्रकारचे सामंजस्य करार करण्याचा संस्थेचा मानस असल्याचे संस्थेचे चेअरमन म. श्री भाऊसाहेब रुपनर यांनी सांगितले. या सामंजस्य करारावेळी फॅब्रटेक टेक्निकल कॅम्पस चे डायरेक्टर डॉ.डि.एस. बाडकर व मेकॅनिकल चे विभाग प्रमुख प्रा.दत्तात्रय नरळे उपस्थित होते.

# नागपंचमी दिवशी पेठनाका ते शिराळा पर्यंतच्या वाहतूक मार्गात बदल

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** नागपंचमी दिवशी शिराळा येथील वाहतूक सुरळीत रहावी, तसेच गर्दीत वाहन घूसून नागरीकांच्या जीवीतास धोका पोहचू नये याकरीता सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस अधीक्षक डॉ. बसवराज तेली यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम चे कलम ३४ प्रमाणे प्रदान केलेल्या अधिकारान्वये पेठनाका ते शिराळा पर्यंतच्या वाहतूक मार्गात दि. २१ ऑगस्ट २०२३ रोजीचे ००.०१ वाजल्यापासून ते दि. २१ ऑगस्ट २०२३ रोजीचे २३.५९ वाजेपर्यंत पुढीलप्रमाणे बदल केला आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ पेठनाका येथून सर्व वाहने एकेरी मार्गाने शिराळ्याकडे जातील. शिराळ्याकडून राष्ट्रीय महामार्ग ४ कडे जाणारी सर्व वाहने शिराळा बायपासमार्गे कापरी-कार्वे-ढगेवाडी फाटा-ऐतवडे बुद्रुक फाटा - लाडेगाव - वशी - येडेनिपाणी फाटा या मार्गाने महामार्ग क्र. ४ कडे जातील. शिराळा बायपास येथून पेठनाक्याकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना प्रवेश बंद राहील. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३१ प्रमाणे शिक्षा किंवा दंड करण्यात येईल, असे आदेश पोलीस अधीक्षक डॉ. बसवराज तेली यांनी जारी केले आहेत.

शिराळा येथील नागपंचमी यात्रा दिनांक २१ ऑगस्ट रोजी साजरी होणार आहे. या दिवशी शिराळा येथे नागपंचमी यात्रा मोठ्या प्रमाणात भरविली जाते. यात्रेस जिल्ह्यातील तसेच जिल्ह्याबाहेरील विविध भागातून मोठ्या प्रमाणावर भाविक, यात्रेकरू मोठ्या संख्येने वाहनाने येत असतात. नागपंचमी दिवशी शिराळ्यात येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांची संख्या प्रचंड असते. त्यामुळे नियमित रस्त्यावर वाहतूकीचा ताण पडून रहदारीस अडथळा होवू शकतो. या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक डॉ. बसवराज तेली यांनी पेठनाका ते शिराळा पर्यंतच्या वाहतूक मार्गात दि. २१ ऑगस्ट रोजीसाठी बदल केल्याचे आदेश जारी केले आहेत.

# राज्यात १० लाख विद्यार्थ्यांच्या नेत्र तपासणीसह वाचनाची सवय वाढीस लागण्यासाठी प्रयत्न : दीपक केसरकर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** वनसाईट इझीलर लक्झोटिका फाऊंडेशन आणि रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या माध्यमातून राज्यातील १० लाख विद्यार्थ्यांची नेत्र आरोग्य तपासणी करण्यात येणार असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी दिली. याचबरोबर शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय वाढीस लागावी यासाठी रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून शाळांमध्ये दोन हजार ग्रंथालये स्थापन करून त्यात दोन लाख पुस्तके उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.



मुंबई : रामटेक या शासकीय निवासस्थानी शालेय शिक्षण विभाग आणि रत्ननिधी ट्रस्टमध्ये द्विपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी उपस्थित मंत्री दीपक केसरकर व संस्थेचे पदाधिकारी

शालेय शिक्षण मंत्री श्री.केसरकर यांच्या उपस्थितीत रामटेक या शासकीय निवासस्थानी आज याबाबतचा सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी वनसाईट फाऊंडेशनच्या संचालक श्रीमती स्वाती पिरामल, फाऊंडेशनचे प्रमुख अनुराग हंस, रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्टचे राजीव मेहता, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, सहसचिव इम्तियाझ काझी यांच्यासह विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

वनसाईट फाऊंडेशनमार्फत आतापर्यंत सहा लाख विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी झाली आहे. यापैकी १६ हजार विद्यार्थ्यांना चष्म्यांचे मोफत वाटप करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा पुढील टप्पा म्हणून येत्या तीन वर्षात आणखी दहा लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याच्या उद्देशाने वनसाईट फाऊंडेशन, रत्ननिधी ट्रस्ट आणि शालेय शिक्षण विभागादरम्यान त्रिपक्षीय करार करण्यात आला आहे. यातील एक लाख विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार चष्मे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

रत्ननिधी ट्रस्टच्या माध्यमातून तरुणांना सक्षम करण्यासाठी आणि शैक्षणिक गुणवत्ता प्रदान करून त्यांची क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातात. यासाठी शालेय शिक्षण विभाग आणि रत्ननिधी ट्रस्टमध्ये द्विपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला असून या माध्यमातून संस्थेमार्फत दर्जेदार कथा पुस्तके, चित्र पुस्तके, बालवाडी पुस्तके, कनिष्ठ, मध्यम आणि वरिष्ठ शाळांसाठी शैक्षणिक संदर्भ पुस्तके तसेच कनिष्ठ महाविद्यालयांसाठी स्पर्धा परीक्षा पुस्तके आणि उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक आणि संदर्भ पुस्तके उपलब्ध करून दिली जाणार आहेत.

दहा लाख विद्यार्थ्यांचे नेत्र आरोग्य राखण्याबरोबरच दर्जेदार पुस्तकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील वाचनाची आवड वाढविण्यासाठी या दोन्ही करारांचा लाभ होईल, असा विश्वास मंत्री श्री.केसरकर यांनी यावेळी व्यक्त केला.




दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

दैनिक
माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस






## सहारा उद्योग समूहाच्या वतीने वृक्षारोपन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**म्हसवड/अहमद मुल्ला :** भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाचे औचित्य साधून १५ऑगस्ट रोजी सहारा उद्योग समूहाच्या वतीने वृक्षारोपनाचा करण्यात आले. भारताला स्वातंत्र्य मिळून ७६ वर्षे पूर्ण झाली. या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त सहारा उद्योग समूहाचे सर्वेसर्वा अजीम तांबोळी यांनी बरीच वर्षे वृक्षांशिवाय असणाऱ्या म्हसवड एस टी स्टँड परिसरात असणाऱ्या दुभाजकावर वृक्षारोपण करण्याचा निर्णय घेतला. हे वृक्षारोपण भारतीय स्वातंत्र्य लढ्यात ज्यांचा सहभाग होता अशा स्वातंत्र्य सेनानींच्या कुटुंबियांच्या हस्ते घेण्यात आला.तसेच म्हसवड पोलीस स्टेशनचे सर्व कर्मचारी अधिकारी व लोकशाही चा चौथा स्तंभ असणारे सर्व पत्रकार बांधव यांचे प्रमुख उपस्थितीत घेण्यात आला.


**म्हसवड : येथील एस टी स्टँड परिसरात असणाऱ्या दुभाजकावर वृक्षारोपण करताना उपस्थित मान्यवर**

या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी माजी स्वातंत्र्य सेनानी कै.आप्पासाहेब दहीवडे यांचे नातू पपेश दहीवडे, म्हसवड पोलीस स्टेशनचे अधिकारी, म्हसवड नगरपरिषदेचे मुख्य अभियंता चैतन्य देशमाने, म्हसवड नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष बंडू धट, आप्पासाहेब पुकळे, डॉ. रमेश काटकर, विश्वंभर बाबर, सचिन देशमाने, डॉ.राजेश शहा, बाळासाहेब पिसे, बाबु मुल्ला, आतुल गोरड, विजय टाकने, महेश कांबळे, एल.के. सरतापे, उमेश बुधावले, प्रवीण राजे, नागनाथ डोंबे, रफीक तांबोळी, मेजर गुलाब शेख , मेजर दिलीप नरळे, समर्थ जाधव, तुळशीराम गोरड, सूरज कर्माळकर, मुद्दाम मुल्ला व मित्र परिवार उपस्थित होते.

## राष्ट्रीय लोकअदालतीचे ९ सप्टेंबरला आयोजन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**सांगली :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली व राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार शनिवार, दि. ९ सप्टेंबर २०२३ रोजी जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश पी. के. शर्मा अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा न्यायालय सांगली, औद्योगिक न्यायालय, कामगार न्यायालय, कौटुंबिक न्यायालय, सहकार न्यायालय १, २ व सांगली जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालत आयोजित करण्यात आलेली आहे. पक्षकारांनी आपली जास्तीत जास्त प्रकरणे या लोकअदालातीमधे ठेवून ती तडजोडीने मिटवून घ्यावीत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव प्रविण कि. नरडेले यांनी केले आहे.
न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे, फौजदारी तडजोडपात्र प्रकरणे, मोटार अपघात प्रकरणे, बँकेची दिवाणी दावे, नियमित दिवाणी दावे, भूमी संपादन प्रकरणे, कौटुंबिक वादातील प्रकरणे, चलनक्षम दस्तऐवज (छ. ख. क्लीं १३८) प्रकरणे, कामगार न्यायालयातील प्रकरणे व दावापूर्व प्रकरणे (विज बिल, टेलिफोन बिल, बँकेतील वसुली प्रकरणे ) या विषयक प्रकरणांसाठी ही राष्ट्रीय लोकअदालत आयोजित करण्यात आलेली आहे.

## प्रकाश आंबेडकरांनी 'इंडिया आघाडी'त यावे : अशोक चव्हाण

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**कोल्हापूर :** देशाला दिशा देण्यासाठी इंडिया आघाडी तयार आहे. प्रत्येक राज्यात वेगवेगळी परिस्थिती आहे. मात्र आम्ही सगळे एकत्र येऊन नवा पर्याय देऊ असे आश्वासन माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी दिले. ते कोल्हापुरात बोलत होते. इंडिया आघाडीत प्रकाश आंबेडकर यावे ही माझी वैयक्तिक भूमिका पण याबाबत वरिष्ठ नेते निर्णय घेतील पण ते इंडिया सोबत आले तर त्यांचा आघाडीला फायदा होईल असेही ते म्हणाले. आमच्याकडे निवडून येणाऱ्याला उमेदवारी देणार आहोत. इंडिया आघाडी नागरिकांना देखील आवडत असल्याचे सांगतानाच यावेळी त्यांनी भाजपवर निशाणा साधला. आमच्या नव्या आघाडीचा धसका भाजपने घेतला असल्याचे ते म्हणाले.
यावेळी बोलताना अशोक चव्हाण म्हणाले की, राज्यात भाजपने किती तोडफोड केली आहे पहा. घोषणा झाल्या पण प्रत्यक्ष अंमलबजावणी कुठं आहे.सगळ्यात जास्त निधीच्या घोषणा या सरकारने केल्या.पण ग्राऊंडवर मात्र नागरिकांना काही मिळताना दिसत नाही.तोडफोड करून उमेदवार देतात आणि घराणेशाही नाही असं म्हणतात, असा टोलाही लगावला.
मागच्या मंत्रिमंडळात अजितदादा उपमुख्यमंत्री होते, मी देखील मंत्रिमंडळात होतो.मराठा आरक्षणाबाबत आता मुंबईत बैठक घेऊन उपयोग नाही. दादांना देखील कायदा कळतो,


**अशोक चव्हाण**


**प्रकाश आंबेडकर**

केंद्राने आता निर्णय घ्यायला पाहिजे.केंद्र सरकारने त्यावेळी राज्याचे हातपाय बांधून टाकले होते. एकनाथ शिंदे आणि आमची भूमिका होती. ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण दिलं पाहिजे. फडणवीस सरकारच्या काळात जो निर्णय झाला तो केवळ नागरिकांची दिशाभूल होती.आता ५० टक्के आरक्षणाची मर्यादा वाढवली पाहिजे. मराठा ओबीसी यांच्यात वाद होऊ शकतो, पण असे वाद होऊ नये अशी माझी इच्छा आहे. आमची १ तारखेला इंडिया ची बैठक मुंबईत आहे,असेही ते म्हणाले.
कोल्हापूरची लोकसभेची जागा काँग्रेसने लढावी ही माझी इच्छा.कारण याठिकाणी आम्हाला चांगले वातावरण आहे. राज्यात शिक्षकांच्या खूप मोठ्या प्रमाणात जागा रिक्त आहेत.डॉक्टर नाही, अनेक विभागात कर्मचारी नाही पण हे सरकार रिक्त जागा भरत नाही.हे सरकार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेत नाही.या सरकारला लोकसभा आणि विधानसभा यावर परिणाम होईल अशी भीती आहे.त्यामुळे लोकसभा आणि विधानसभा झाल्याशिवाय या निवडणुका घेतात की नाही याबद्दल शंका असल्याचेही ते म्हणाले.

## दसरा चौकात शरद पवारांची होणार जाहीर सभा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**कोल्हापूर :** अजित पवार यांच्या बंडखोरी नंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात उभी फुट पडल्यानंतर राष्ट्रवादी आता दोन भागात विभागला आहे. त्यानंर झालेल्या राजकिय घडोमोडीनंतर अनेक तर्कवितर्क लढवण्यात आले. त्यानंतर आता शरद पवार यांनी कार्यकर्त्यांचा संभ्रम दूर करण्यासाठी तसेच पक्षाची नव्याने बांधणी करण्यासाठी महाराष्ट्र दौरा सुरु असून येत्या २५ ऑगस्ट रोजी त्यांची कोल्हापूरात सभा होणार आहे.
राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर अजित पवार यांनी जनतेला भावनिक साद घालण्यासाठी महाराष्ट्र दौरा सुरु केला आहे. गेल्या काही दिवसात राजकिय घडामोडीच्या पार्श्वभुमीवर कार्यकर्त्यांमधील संभ्रम दुर करण्याबरोबरच राष्ट्रवादीची नव्याने बांधणी करणे अशा दुहेरी पातळ्यावर शरद पवार ॲक्टीव झाल्याचे दिसून येत आहे.
कोल्हापूरातील ऐतिहासिक दसरा चौकात शरद पवारांची जाहीर सभा होणार असून श्रीमंत शाहू महाराज छत्रपती असणार सभेच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. राजर्षी छत्रपती शाहू महारांजांच्या समाधीला शरद पवार वंदन करणार असून त्यानंतर शहरात भव्य मोटरसायकल रॅली निघणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार श्रीनिवास पाटील यांच्यासह अनेक मान्यवर राहणार उपस्थित राहणार असून कोल्हापूरातील राष्ट्रवादी काँग्रेसचा शरद पवार गट यासाठी कामाला लागला आहे.
राष्ट्रवादीच्या बंडखोर नेत्यांच्या जिल्ह्यांमध्ये कोल्हापूर हा एक महत्वाचा जिल्हा मानला जातो. एकेकाळचे शरद पवारांचे निष्ठावान आणि सध्याचे अजित पवारांचे निष्ठावान असलेल्या राज्याचे मंत्री हसन मुश्रीफ यांच्या बरोबर ही जिल्हातील महत्वाचे नेतेही अजित पवारांबरोबर गेल्याने एकाकी पडलेल्या शरद पवार गटाला उर्जा देण्यासाठी शरद पवार हे येत्या २५ तारखेदरम्यान कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत.


**शरद पवार**

## कोल्हापूर-मुंबई मार्गावर नियमित विमानसेवा सुरू होणार : धनंजय महाडिक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**कोल्हापूर :** कोल्हापूरच्या विमानतळाचा जलद गतीने विकास होत असतानाच आता कोल्हापूर ते मुंबई या मार्गावर दररोज विमानसेवा उपलब्ध होणार आहे. खासदार धनंजय महाडिक यांनी सातत्याने पाठपुरावा करून,कोल्हापूर ते मुंबई या मार्गावर सोयीस्कर वेळेत दैनंदिन विमानसेवा सुरू करण्यात यश मिळवले आहे. १ ऑक्टोबर २०२३ पासून स्टार एअर या नामांकित कंपनीकडून, कोल्हापूर ते मुंबई आणि मुंबई ते कोल्हापूर या मार्गावर दैनंदिन विमानसेवा सुरू होत आहे. आठवड्यातील सातही दिवस मुंबईसाठी विमानसेवा सुरू होत असल्याने व्यापारी,उद्योजक, कलाकार, खेळाडू अशा सर्वांचीच मोठी सोय होणार आहे.
१ ऑक्टोबर पासून स्टार एअर कंपनीकडून ही दैनंदिन विमानसेवा सुरू होईल.त्यानुसार रोज सकाळी साडेनऊ वाजता मुंबईहून कोल्हापूरच्या दिशेने विमान उड्डाण करेल आणि सकाळी साडेदहा वाजता हे विमान कोल्हापुरात येईल.त्यानंतर सकाळी दहा वाजून पन्नास मिनिटांनी,कोल्हापूर विमानतळावरून मुंबईच्या दिशेने विमान झेप घेईल आणि सकाळी अकरा वाजून पन्नास मिनिटांनी हे विमान मुंबई विमानतळावर उतरेल त्यामुळे दिवसभरातील मुंबईतील कार्यालयीन कामे करणे सर्वांनाच सोयीचे ठरणार आहे.आठवड्यातील सातही दिवस मुंबई – कोल्हापूर– मुंबई या मार्गावर विमानसेवा सुरू होत असल्याने, निश्चितच कोल्हापूरच्या औद्योगिक प्रगतीला चालना मिळेल, असा विश्वास खासदार धनंजय महाडिक यांनी व्यक्त केला.


**धनंजय महाडिक**







## महिला व बालकांच्या आरोग्यासह शैक्षणिक विकासासाठीच्या योजनांची अंमलबजावणी करा : आदिती तटकरे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**मुंबई :** अनुसूचित क्षेत्रासह राज्यातील अंगणवाड्यांमध्ये दिला जाणारा पोषण आहार बालकांपर्यंत निश्चित प्रमाणात देण्यासंदर्भात तपासणी करावी. महिला व बालकांच्या आरोग्यासह शैक्षणिक विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणी संदर्भातील अहवाल सादर करावा. नवरात्री उत्सवात नऊ रंगाचे पोषण मूल्य असलेले आहार मुलांना देण्याच्या सूचना महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिल्या.
जिल्हा नियोजन समिती अंतर्गत करावयाच्या खर्च, जिल्हा परिषद ग्राम विकास विभागांतर्गत असणाऱ्या १० टक्के निधीबाबत निकष ठरविणे, बेटी बचाव-बेटी पढाओ, अमृत आहार योजना, नवरात्रीमध्ये नऊ रंगाच्या अनुषंगाने पोषण आहार, रक्षाबंधन निमित्त कार्यक्रमांचा आढावा घेण्यासंदर्भात आज मंत्रालयात मंत्री श्रीमती तटकरे यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती.



मंत्री कु. तटकरे म्हणाल्या की, भारतरत्न डॉ.ए.पी.जे अमृत आहार योजनेअंतर्गत आदिवासी भागात तसेच, अंगणवाडीमध्ये पूरक पोषण आहार योजनेअंतर्गत आहार दिला जातो. आहाराच्या ठरवून दिलेल्या मापदंडानुसार व नियमिततेसंदर्भात तपासणी करावी. नगरपालिकेच्या हद्दीतील अंगणवाडी नागरी अंगणवाडी म्हणून घोषीत करून, त्यांच्या देखभालीची जबाबदारी निश्चित करावी. विभागीय कार्यालयांवर सोलार पॅनल लावण्यासंदर्भात कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.
महिला व बाल सशक्तीकरण योजनेसाठी दिल्या जाणाऱ्या जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ३ टक्के निधीव्यतिरिक्त अंगणवाडी बांधणे व दुरूस्ती करण्यासाठीच्या निधीबाबत प्रस्ताव सादर करावा. डॉ. अब्दुल कलाम योजनेंतर्गत येणाऱ्या ४२० अंगणवाडी केंद्रांना योजना शहरी भागात लागू करणेबाबत प्रस्ताव सादर करावा. तसेच अनुसूचित क्षेत्रात गर्भवती व स्तनदा माता यांच्या आरोग्याची काळजी घेणे, कमी वजनाची बालके जन्माला येण्याचे प्रमाण कमी करणे, कुपोषण निर्मूलन, स्त्रियांमधील ॲनिमियाचे प्रमाण कमी करणे, बेटी बचाव बेटी पढाओ कार्यक्रम राबविण्यासाठी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही मंत्री कु. तटकरे यांनी दिल्या.
यावेळी महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुप कुमार यादव, एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या आयुक्त रूबल अग्रवाल, महिला व बालविकास आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे उपस्थित होते.

# सहाय्यक पोलीस निरीक्षक रविराज फडणीस यांना राष्ट्रपती पुरस्कार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कोल्हापूर :** कुरुंदवाड येथील पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रविराज अनिल फडणीस यांना १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त राष्ट्रपती पुरस्कार मिळाला. हा पुरस्कार कोल्हापूर येथे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व पदक देऊन बहाल करण्यात आला. कुरुंदवाड पोलीस ठाण्यात राष्ट्रपती पुरस्कार मिळवणारे ते एकमेव अधिकारी आहेत.

सांगली जिल्ह्यातील मिरज गांधीनगर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील एमआयडीसीतील मिलिंद केमिकल कारखान्याला आग लागली होती. या आगीत अडकलेल्या तिघांना सुखरूप बाहेर काढून त्यांचे प्राण वाचवल्याबद्दल महाराष्ट्र राज्य सरकारने दखल घेत २६ जानेवारी २०२३ रोजी केंद्र सरकारचा उत्तम जीवन रक्षा देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले होते.



**कोल्हापूर : कुरुंदवाडचे पोलीस अधिकारी रविराज फडणीस यांना राष्ट्रपती पुरस्कार प्रदान करताना उपमुख्यमंत्री अजित पवार व उपस्थित मान्यवर**

महाराष्ट्र राज्यातून एकमेव पदक बहाल करून त्यांचा सन्मान केला आहे.

रविराज फडणीस यांच्या कर्तव्यदक्ष पोलीस सेवेची शासनाच्या गृह विभागाने दखल घेऊन त्यांना १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनानिमित्त राष्ट्रपती पुरस्कार जाहीर केला. हा पुरस्कार कोल्हापूर येथे जिल्हाधिकारी कार्यालयात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पदक व प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर खासदार धनंजय महाडिक आमदार अमल महाडिक जिल्हाधिकारी राहुल रेखावार व राजकीय व शासकीय अधिकारी मोठ्या संख्येने हजर होते.

# ॲड.मिनाक्षी पोळ यांचा सत्कार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/अहमद मुल्ला :** सहाय्यक सरकारी अभियोक्ता महाराष्ट्र राज्य (वर्ग १) पदी मीनाक्षी पोळ यांची निवड झाल्याबद्दल विधाता सामाजिक संस्थेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विधाता सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सचिन लोहार, ॲड आनंदा पोळ, अहमद मुल्ला, परेश व्होरा, अजित वेदपाठक व राहुल खाडे उपस्थित होते.



**म्हसवड : येथे ॲड. मिनाक्षी पोळ यांचा विधाता सामाजिक संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवर**

नुकत्याच घेण्यात आलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहाय्यक सरकारी अभियोक्ता या परीक्षेमधून सहाय्यक सरकारी अभियोक्ता महाराष्ट्र राज्य (वर्ग १) पदी देवापूरच्या ॲड. मीनाक्षी आनंदा पोळ यांची निवड झाली. वयाच्या ४५ व्या वर्षी पहिल्याच प्रयत्नात त्यांनी सहाय्यक सरकारी अभियोक्ता या पदाला गवसणी घातली.

त्या २३ वर्ष वकिली क्षेत्रात कार्यरत आहेत. सध्या पनवेल जि.रायगड येथे त्या कार्यरत आहेत.त्यांनी एल.एल.बी. चे शिक्षण सांगली येथील एन.एस.लॉ. कॉलेज येथे पूर्ण केले.

# खाद्यपदार्थांमध्ये टोमॅटोचा वापर बंद

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** टोमॅटोच्या गगनाला भिडले आहेत. वाढत्या किंमतीने  मॅकडोनाल्ड आणि सबवे सारख्या ब्रँडना त्यांच्या बर्गर, पिझ्झा इत्यादींमधून टोमॅटो काढायला भाग पाडले आहे. त्याचवेळी, बर्गर किंग हे आणखी एक प्रसिद्ध नावही यात सामील झाले आहे. फास्ट फूड चेन बर्गर किंगने आपल्या खाद्यपदार्थांमध्ये टोमॅटोचा वापर बंद केला आहे. जाणून घ्या या मागील कारण.

बर्गर किंगची देशात सुमारे ४०० स्टोअर्स आहेत. कंपनीने आपल्या वेबसाइटवर सांगितले की, टोमॅटो पिकाच्या गुणवत्ता आणि कमी पुरवठा यामुळे आम्ही आमच्या खाद्यपदार्थांमध्ये टोमॅटोतचा वापर करू शकत नाही. कंपनीने ग्राहकांना संयम बाळगण्याची विनंतीही केली आहे.

मुसळधार पावसामुळे पुरवठा विस्कळीत झाल्याने देशाच्या काही भागात टोमॅटोचा किरकोळ भाव २०० रुपये किलोपर्यंत आहे. यामुळे सरकारला प्रथमच टोमॅटोची आयात करावी लागली आहे. भारत सध्या नेपाळमधून टोमॅटो आयात करत आहे. गेल्या आठवड्यात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत माहिती दिली की, देशांतर्गत बाजारात किमतीत विक्रमी वाढ होत असताना भारताने नेपाळमधून टोमॅटोची आयात सुरू केली आहे. जुलैमध्ये, फास्ट फूड चेन मॅकडोनाल्ड्सने सांगितले होते की, त्यांनी दर्जेदार उत्पादनांच्या अनुपलब्धतेचे कारण देत देशाच्या उत्तर आणि पूर्व भागातील त्यांच्या बहुतेक स्टोअरमध्ये अन्न तयार करण्यासाठी टोमॅटोचा वापर करणे बंद केले आहे. यासोबतच सबवे इंडियानेही प्रमुख शहरांमधील वाढत्या किमतीला तोंड देण्यासाठी टोमॅटोचा वापर बंद केला आहे.

# आयर्लंडविरुद्धच्या टी-२० मध्ये बुमराह असणार कर्णधार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** आज पासून आयर्लंडविरुद्ध सुरू होणाऱ्या तीन सामन्यांच्या टी२० आंतरराष्ट्रीय मालिकेत तो भारतीय क्रिकेट संघाचे बुमराह नेतृत्व करेन. भारत आणि आयर्लंड यांच्यातील पहिला टी२० सामना शुक्रवार, १८ ऑगस्ट रोजी मलाहाइड क्रिकेट क्लबमध्ये खेळवला जाईल. संध्याकाळी ७.३० वाजता सामन्याला सुरुवात होईल.

वेस्ट इंडिजविरुद्ध टी२० मालिका गमावल्यानंतर भारतीय संघावर माजी क्रिकेटपटूंसह चाहत्यांच्याही टीकेला सामोरे जावे लागले होते. त्यामुळे त्याची भरपाई म्हणून टीम इंडिया या मालिकेत नक्कीच चांगली कामगिरी करून यश संपादन करण्याचा प्रयत्न करेल. भारतीय फलंदाजीबाबत बोलायचे झाल्यास, फक्त तिलक वर्मा आणि सूर्यकुमार यादव यांनी विंडीज मालिकेत अनुक्रमे १७३ आणि १६६ धावा करत चांगली कामगिरी केली होतीयुवा रिंकू सिंग आणि जितेश शर्मा यांचा प्रथमच टी२० संघात समावेश करण्यात आला आहे, त्यांचा प्लेईंग ११मध्ये खेळण्याची संधी मिळते का? हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

भारतीय संघ : ऋतुराज गायकवाड (उपकर्णधार), यशस्वी जैस्वाल, तिलक वर्मा, रिंकू सिंग, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), शिवम दुबे, वॉशिंग्टन सुंदर, रवी बिश्नोई, अर्शदीप सिंग, जसप्रीत बुमराह (कर्णधार), मुकेश कुमार

# सांगली येथे १२ सप्टेंबरला डाक अदालत

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** भारतीय डाक विभागाची विभागीय स्तरावरील डाक अदालत   दि. १२ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी ११ वाजता प्रवर अधीक्षक डाकघर सांगली विभाग सांगली यांच्या कार्यालयात आयोजित केली आहे. तक्रारी स्वीकारण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २०२३ आहे, अशी माहिती सांगली डाकघर विभागाचे प्रवर डाक अधीक्षक यांनी दिली.

पोस्टाच्या सेवेविषयी किंवा कामकाजाबद्दल ज्या तक्रारींचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झालेले नसेल व समाधानकारक उत्तर मिळाले नसेल अशा तक्रारींची या डाक अदालत मध्ये दखल घेतली जाणार आहे. संबंधितांनी आपली तक्रार प्रवर अधीक्षक डाकघर सांगली यांच्या पत्त्यावर दिनांक ३१ ऑगस्ट २०२३ पर्यंत समक्ष अथवा पोस्टाने पाठवावी, असे आवाहन प्रवर डाक अधीक्षक सांगली यांनी केले आहे.














